# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 23 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २३ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- राष्ट्रीय आरोग्य अभियानाला २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
- दावोसमध्ये महाराष्ट्रासाठी १५ लाख सत्तर हजार कोटी रुपये गुंतवणुकीचे सामंजस्य करार, सुमारे १६ लाख रोजगारनिर्मिती होणार
- निवडणुकीतल्या उत्तम कामगिरीसाठी महाराष्ट्राला केंद्रीय निवडणूक आयोगाचा पुरस्कार जाहीर
- जळगाव इथं रेल्वे अपघातात १२ जणांचा मृत्यू
- वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याला शाश्वत पाणी उपलब्ध होणार, मंत्री गुलाबराव पाटील यांची ग्वाही

आणि

- बेटी बचाओ बेटी पढाओ’ योजनेचा दहाव्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम

****

केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय आरोग्य अभियानाला २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. काल नवी दिल्लीत मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी ही माहिती दिली. २०२३-२४ या आर्थिक वर्षात या मोहिमेअंतर्गत देशात आयुष्मान आरोग्य मंदिरांची संख्या एक लाख ७२ हजार झाली आहे, तर सरकारच्या डायलिसीस मोहिमेचा साडेचार लाख रुग्णांना लाभ झाल्याची माहिती गोयल यांनी दिली. ते म्हणाले –

***नॅशनल हेल्थ मिशन के द्वारा जिस प्रकार के ऐतिहासिक टार्गेटस् को मिट करने का काम गत दस वर्षों मे माननीय प्रधानमंत्रीजी के नेतृत्व मे हुआ है, लगबग बारा लाख हेल्थ केअर्स के वर्कर्स 2021–22 के बीच मे नॅशनल हेल्थ मिशन के साथ जुडे। दो सौ बीस करोड से अधिक कोविड–19 के वॅक्सिन डोसेज् देशभर मे दिये गये। 2023–24 तक 1,72,000 आयुष्यमान आरोग्य मंदिर सेंटर्स खुल चुके है।***

२०२५–२६ च्या पणन हंगामासाठी कच्च्या तागाच्या किमान हमी भावात प्रति क्विंटल तीनशे पंधरा रुपयांची वाढ करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळानं कालच्या बैठकीत घेतला. या निर्णयामुळे कच्च्या तागाला यावर्षी पाच हजार सहाशे पन्नास रुपये प्रति क्विंटल, असा किमान हमी भाव मिळेल.

****

स्वित्झर्लंडमधल्या दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक गुंतवणूक परिषदेत राज्य सरकारने रिलायन्स उद्योग समूहासोबत तीस खर्व अर्थात तीन लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आहेत. या कराराच्या माध्यमातून सुमारे तीन लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं, ते म्हणाले –

***तीन लाख पाच हजार कोटी रुपयांचा हा एम ओ यु आहे. या एम ओ यू च्या माध्यमातनं रिलायंस इंडस्ट्रीज् ही विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये चाललेली आहे. आणि सगळ्यात महत्वाचं आहे की, जास्तीत जास्त ही इन्व्हेस्टमेंट वेगवेगळ्या प्रकारच्या सर्विस सेक्टरमध्ये जात असल्यामुळे त्यातनं जवळपास तीन लाख लोकांना जॉब्स मिळू शकतील. अशा प्रकारची ही इन्व्हेस्टमेंट या ठिकाणी येते आहे.***

दरम्यान, या गुंतवणूक परिषदेत काल दुसऱ्या दिवशीपर्यंत महाराष्ट्रात १५ लाख ७० हजार कोटी रुपये गुंतवणुकीचे एकूण ५४ सामंजस्य करार करण्यात आले. यातून जवळपास १६ लाख रोजगारनिर्मिती होणार आहे.

****

मैत्री कायद्याला अधिक बळकट करण्यासाठी राज्यसरकार एक विशेष पोर्टल तयार करत असल्याचं, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितलं आहे. ते काल दावोस इथून पत्रकारांशी बोलत होते. या पोर्टलबाबत अधिक माहिती देतांना सामंत म्हणाले –

***हे पोर्टल आल्यानंतर उद्योजकांना कमीत कमी वेळेमध्ये सगळे दाखले मिळायला त्याचा उपयोग होणार आहे. देशातलं हे पहिलं पोर्टल असं आहे, की ॲप्लिकेशन कसं करायचं आणि ॲप्लिकेशन केल्यानंतर ते ॲप्लिकेशन नक्की कुठे आहे हे दाखवणारं पोर्टल पुढच्या आठ दिवसांमध्ये कॅबिनेटच्या निमित्तानं आम्ही महाराष्ट्रामध्ये आणतोय. त्याचं देखील अनेक उद्योजकांनी स्वागत केलेलं आहे.***

****

निवडणूक काळात उत्तम कामगिरी केल्याबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगाचे पुरस्कार काल जाहीर झाले. महाराष्ट्र, जम्मू-काश्मीर तसंच झारखंड राज्य निवडणूक आयोगाची यंदाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना, टपाली मतपत्रिका देवाण-घेवाण कार्यवाहीसाठी उत्कृष्ट नियोजनाचा पुरस्कार, सिल्लोडचे उपविभागीय अधिकारी लतिफ पठाण यांना, उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांना, उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून गौरवण्यात येणार आहे. उत्कृष्ट वार्तांकनाचा पुरस्कार माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे तत्कालीन संचालक डॉ राहुल तिडके आणि उपसंचालक दयानंद कांबळे यांना जाहीर झाला आहे. येत्या शनिवारी, राष्ट्रीय मतदार दिनी नवी दिल्लीत हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

****

जळगाव जिल्ह्यात काल एका विचित्र दुर्घटनेत १२ रेल्वेप्रवाशांचा मृत्यू झाला. मुंबईकडे जाणाऱ्या पुष्पक एक्सप्रेसला आग लागल्याच्या अफवेनंतर अनेक प्रवाशांनी गाडीतून उड्या मारल्या, मात्र त्याचवेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या कर्नाटक एक्सप्रेसखाली हे प्रवासी सापडले. या घटनेत ११ प्रवासी जखमी झाले. काल दुपारी जळगाव ते पाचोरा दरम्यान परधाडे स्थानकाजवळ ही दुर्घटना घडली. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळी दाखल होऊन मदतकार्याचा आढावा घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेबद्दल दु:ख व्यक्त करत, मृतांच्या वारसांना राज्य शासनाकडून पाच लाख रुपयांची मदत, तर जखमींवर सर्व उपचार मोफत करण्यात येतील, असं जाहीर केलं.

***जे त्या ठिकाणी मृत आहेत त्यांच्या कुटुंबांना पाच लाख रूपये मदत आमच्या सरकारच्या वतीनं आम्ही देणार आहोत. आणि जे जखमी आहेत, त्यांचा संपूर्ण उपचार वेगवेगळ्या हॉस्पिटल्समध्ये जिथे जिथे ते आहेत, सगळा मोफत उपचार त्या ठिकाणी करण्यात येईल. आणि जे नातेवाईक आहेत, त्यांना नीट सगळ्या गोष्टी मिळाव्यात अशा करता देखील सर्वप्रकारचे निर्देश देण्यात आलेले आहेत.***

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं असून, जखमींना आवश्यक ती मदत करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

****

कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची तुळजाभवानी, माहूरची रेणुकादेवी ही तीन शक्तीपीठं जोडणाऱ्या नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला आता गती आली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळानं यासाठीच्या पर्यावरणीय परवानग्यांची प्रक्रिया सुरू केली असून, आता मराठवाड्यातल्या काही जिल्ह्यात भूसंपादन प्रक्रियेला सुरुवात करण्यात आल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

****

'मराठवाडा वॉटर ग्रीड' प्रकल्पाच्या माध्यमातून मराठवाड्याला दीर्घकालीन स्वरुपात शाश्वत पाणी उपलब्ध होणार असल्याचं, पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटलं आहे. या प्रकल्पाबाबत जागतिक स्तरावरील बँकांच्या प्रतिनिधींसमवेत काल मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या योजनेत मराठवाड्यातली ११ मोठी धरणं जलवाहिनीद्वारे जोडून सर्व शहरं तसंच गावांना पिण्याचं पाणी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचं पाटील यांनी सांगितलं.

****

संतोष देशमुख हत्या प्रकरणात मकोका खाली अटकेत असलेला आरोपी वाल्मिक कराड याला बीड जिल्हा सत्र न्यायालयानं चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. याआधीची पोलीस कोठडीची मुदत संपल्यावर कराड याला काल जिल्हा

सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं, त्यावेळी विशेष सत्र न्यायाधीशांनी हा निर्णय दिला.

****

जालना इथल्या प्रसिद्ध योग शिक्षक संगीता लाहोटी यांच्या हत्येप्रकरणी त्यांचा नोकर भीमराव धाडे याला जिल्हा आणि सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते यांनी जन्मठेप आणि आर्थिक दंडाची शिक्षा सुनावली आहे. १४ डिसेंबर २०२१ रोजी लाहोटी यांची राहत्या घरी हत्या झाली होती.

****

'बेटी बचाओ बेटी पढाओ' या योजनेचा दहावा वर्धापनदिन काल सर्वत्र विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग हा पुरुषांच्या बरोबरीनं असायला हवा, तरच देशाची खऱ्या अर्थाने प्रगती होईल, असं मत छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी व्यक्त केलं. जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्ह्यात मुलींचा घटता जन्मदर ही चिंतेची बाब असल्याचं त्यांनी नमूद केलं.

परभणी इथं जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला. या दशकपूर्तीनिमित्त जिल्हाभरात मानसिक स्वास्थ्य आणि कौशल्य विकास अशा विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार आहे.

****

केंद्र शासनाचा ॲग्री स्टिक या डिजिटल उपक्रमाअंतर्गत धाराशिव जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी नोंदणी करून शेतकरी ओळख क्रमांक १५ फेब्रुवारीपर्यंत काढून घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकारी सचिन ओंबासे यांनी केलं आहे. यासाठी गावनिहाय शिबिर घेण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

****

कोलकाता इथं झालेल्या पहिल्या टी - ट्वेंटी क्रिकेट सामन्यात काल भारताने इंग्लंडचा सात गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत इंग्लंडच्या संघाने दिलेलं १३३ धावांचं लक्ष्य भारताने १३ व्या षटकात पूर्ण केलं. पाच सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना येत्या शनिवारी चेन्नई इथं खेळला जाणार आहे.

दरम्यान, महिला क्रिकेटमध्ये १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताचा सामना आज श्रीलंकेसोबत होणार आहे.

****

राज्यस्तरीय ग्राफलिंग शालेय कुस्ती स्पर्धेत धाराशिवची महिला मल्ल पौर्णिमा खरमाटे हिने सुवर्ण पदकाची कमाई केली. या विजयामुळे पौर्णिमाची १९ वर्षांखालील राष्ट्रीय क्रीडा कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

****

धाराशिव जिल्हा क्रीडा पुरस्कार काल जाहीर झाले. गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार रितेश जाधव यांना, तर खोखो खेळाडू विजय शिंदे आणि संपदा मोरे यांना गुणवंत खेळाडूचा पुरस्कार मिळाला आहे. प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते या पुरस्कारांचं वितरण होईल.

****